आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
१७ मे २०२५ - शनिवार

**ठळक बातम्या**

- ऑपरेशन सिंदूरच्या पार्श्वभूमीवर पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादाविरोधात भारताची भूमिका मांडण्यासाठी केंद्रसरकार विविध देशांमध्ये बहुपक्षीय प्रतिनिधिमंडळ पाठवणार

- आयएसआय दहशतवादी संघटनेतल्या स्लीपर मॉड्यूलच्या दोन सदस्यांना मुंबई विमानतळावर अटक

- पाकिस्तानचे गुप्तहेर असल्याच्या आरोपावरून हरयाणातल्या यूट्यूबर महिलेसह एका तरुणाला अटक

**आणि**

- आठवड्याभरानंतर सुरू झालेल्या आयपीएल क्रिकेट स्पर्धेवर पावसाचं सावट

**<><><><><><>**

ऑपरेशन सिंदूरच्या पार्श्वभूमीवर पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादाविरोधात भारताची भूमिका मांडण्यासाठी केंद्र सरकार सात बहुपक्षीय प्रतिनिधिमंडळं विविध देशांमध्ये पाठवणार आहे. या महिन्याच्या अखेरीला ही प्रतिनिधिमंडळं संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या सदस्यांसह प्रमुख भागीदार देशांना भेट देतील. या प्रतिनिधी मंडळात विविध राजकीय पक्षांचे खासदार, प्रमुख राजकीय व्यक्तिमत्व आणि प्रतिष्ठित राजनैतिक अधिकाऱ्यांचा समावेश असेल.

भाजपचे रवी शंकर प्रसाद आणि बैजयंत पांडा, काँग्रेसचे शशी थरूर,

जदयूचे संजय कुमार झा, डीएमके च्या कनिमोळी, राष्ट्रवादी काँग्रेसच्या सुप्रिया सुळे आणि शिवसेनेचे श्रीकांत शिंदे हे सात नेते आपापल्या प्रतिनिधिमंडळांचं नेतृत्व करतील. ही सर्वपक्षीय प्रतिनिधिमंडळं दहशतवादाविरोधातला भारताचा शून्य सहिष्णुता दृष्टिकोन जगासमोर मांडतील, अशी माहिती संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी दिली. राजकीय मतभेदांच्या पलीकडे, राष्ट्रीय एकतेचं हे शक्तिशाली प्रतीक असल्याचं ते म्हणाले.

दरम्यान, काँग्रेस नेते शशी थरूर यांनी जगातल्या ५ देशांमध्ये भारताच्या प्रतिनिधी मंडळाचं नेतृत्व करण्याची जबाबदारी आपल्यावर सोपवल्याबद्दल केंद्र सरकारचे आभार मानले आहेत. राष्ट्रहितासाठी आणि आपल्या सेवेची आवश्यकता असेल, त्या वेळी आपण सदैव उपलब्ध राहू, असं त्यांनी म्हटलं आहे.

भारताच्या प्रतिनिधी मंडळाचं नेतृत्व करण्याची जबाबदारी स्वीकारताना राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी प्रधानमंत्री, संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू आणि परराष्ट्र मंत्रालयाचे आभार मानले आहेत. भारत जगातली तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनण्याच्या दिशेनं झपाट्याने वाटचाल करत आहे, मात्र काही देश दहशतवादाला पाठिंबा देणाऱ्या देशांच्या पाठीशी आहेत, हे दुर्दैव असल्याचं प्रतिनिधी मंडळाचे सदस्य शिवसेना खासदार श्रीकांत शिंदे यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

देशातला प्रत्येक नागरिक  देशरक्षणासाठी मदत करण्यासाठी सक्षम आहे, असं उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी म्हटलं आहे. ते आज नवी

दिल्लीतल्या जयपुरीया व्यवस्थापन संस्थेच्या दीक्षांत समारंभात बोलत होते. व्यापार, उद्योग आणि वाणिज्य क्षेत्र आपल्या प्रयत्नातून देशाच्या संरक्षणात महत्वपूर्ण भूमिका निभावू शकतात. देशातल्या प्रत्येकानं आर्थिक राष्ट्रवादाचा गांभीर्यानं विचार करण्याची गरज आहे, असं ते म्हणाले. आपल्या देशाच्या संकटकाळात विरोधी भूमिका घेणाऱ्या देशांना कोणतीही मदत करणं योग्य नसल्याचं मत त्यांनी व्यक्त केलं.

भारताच्या दहशतवादविरोधी प्रयत्नांचं आणि त्यासाठी वापरण्याच्या युद्ध तंत्रज्ञानाचं एक नवीन मानक आता स्थापित झालं आहे, असं ते यावेळी म्हणाले.

<><><><><>

भारतीय सेनादलांनी केलेल्या ऑपरेशन सिंदूरच्या गौरवार्थ देशात ठिकठिकाणी तिरंगा यात्रा काढण्यात येत आहेत. उत्तराखंडमध्ये काढलेल्या तिरंगा यात्रेत मुख्यमंत्री पुष्कर सिंग धामी सहभागी झाले होते. पुदुच्चेरी इथे पाँडिचेरी विद्यापीठातर्फे काढलेल्या तिरंगा यात्रेत नायब राज्यपाल के कैलासनाथन यांनी हिरवा झेंडा दाखवला, तर कुलगुरू डॉ प्रकाश बाबू, गृहमंत्री ए. नमशिवायम आणि आमदार कल्याणसुंदरम यांच्यासह अनेक पदाधिकारी, प्राध्यापक आणि विद्यार्थी सहभागी झाले होते. महाराष्ट्रातही जनसामान्यांमधे ऑपरेशन सिंदूरबद्दल अभिमान आणि गौरवाची भावना व्यक्त होत आहे. नवी मुंबई, गडचिरोली, कोल्हापूर, हिंगोली, भंडारा, सांगली, गोंदिया, तुळजापूर, पालघर, इत्यादी ठिकाणी मोठ्या उत्साहात तिरंगा यात्रा काढण्यात आल्या. ऐकुया सांगली इथल्या तिरंगा यात्रेवेळी नागरिकांनी दिलेल्या प्रतिक्रिया

**होल्ड - बाईट**

**<><><><><><>**

भारताने प्रधानमंत्री मोदी यांच्या नेतृत्वाखाली दहशतवादी हल्ल्यांना दिलेल्या चोख प्रत्युत्तरामुळे पाकिस्तानच्या उरात धडकी भरली असून जग विस्मयचकित झालं आहे, असं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी म्हटलं आहे. गुजरातमधल्या गांधीनगर इथे महानगरपालिकेच्या ७०० कोटी रुपये खर्चाच्या प्रकल्पांचा प्रारंभ केल्यानंतर ते एका सभेत बोलत होते.
ऑपरेशन सिंदूर मध्ये देशाच्या सैन्यदलांनी केलेल्या नेत्रदीपक कामगिरीची प्रशंसा करताना त्यांनी दहशतवादाप्रति शून्य सहिष्णुतेच्या सरकारच्या भूमिकेचा पुनरुच्चार केला. भारतीय नागरिकांवर कोणताही दहशतवादी हल्ला झाल्यास आम्ही दुप्पट ताकदीने त्याला प्रत्युत्तर देऊ, असं ते म्हणाले.

**<><><><><><>**

केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान उद्या महाराष्ट्राच्या दौऱ्यावर असून यावेळी ते नागपूरला भेट देणार आहेत. यावेळी ते ‘विकसित कृषी’ या विषयावरच्या उच्चस्तरीय बैठकीचं अध्यक्षपद भूषवतील आणि नागपूर जिल्ह्याच्या प्रमुख कृषी विषयक आणि ग्राम विकास योजनांचा आढावा घेतील. आपल्या दौऱ्यात ते ‘नॅशनल सॉईल स्पेक्ट्रल लायब्ररीचं’ उदघाटन करतील. या कार्यक्रमात कृषी क्षेत्रासाठी नवोन्मेषी योगदान देणाऱ्या प्रगतिशील शेतकऱ्यांचा गौरव केला जाईल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत.

**<><><><><><>**

एनआयए, अर्थात राष्ट्रीय तपास संस्थेनं आयएसआय या बंदी घालण्यात आलेल्या दहशतवादी संघटनेच्या स्लीपर मॉड्यूल च्या दोन सदस्यांना अटक केली आहे. २०२३ साली महाराष्ट्रात पुणे इथं आयईडी ही स्फोटकं बनवणं आणि त्याची चाचणी केल्याचा त्यांच्यावर आरोप आहे. एनआयएनं त्यांना मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर अटक केली असून, ते इंडोनेशियाच्या जकार्ता इथून परतले होते. हे दोन्ही आरोपी गेली दोन वर्ष फरार होते आणि एनआयएच्या मुंबईतल्या विशेष न्यायालयानं त्यांच्या विरोधात अजामीनपात्र वॉरंटही जारी केलं होतं. दोन्ही आरोपींची माहिती देणाऱ्यांना एनआयएनं प्रत्येकी ३ लाख रुपयांचं रोख बक्षीस जाहीर केलं होतं. या प्रकरणाचा तपास सुरू असल्याचं एनआयए च्या सूत्रांनी सांगितलं.

**<><><><><>**

हरयाणा पोलिसांनी आज हिसार इथं यू ट्यूबच्या माध्यमातून सक्रिय असणाऱ्या ज्योती रानी या महिलेला पाकिस्तानची संशयित गुप्तहेर असल्याच्या आरोपावरून अटक केली आहे. तिला न्यायालयात हजर केलं असता न्यायालयानं तिला ५ दिवसांची कोठडी सुनावली आहे. ज्योती रानी पाकिस्तानी गुप्तचर संघटनांच्या संपर्कात राहून समाजमाध्यमांच्या मदतीनं त्यांना महिती पुरवत असल्याचं हिसारचे पोलीस उपअधीक्षक कमलजीत यांनी सांगितलं.

दरम्यान, हरयाणात कैथाल इथल्या मस्तगड गावातून देवेंदर सिंह या २५ वर्षीय युवकालाही पाकिस्तनची गुप्तचर संघटना आय एस आय चा संशयित गुप्तहेर असल्याच्या आरोपावरून अटक केली आहे. देवेंदर भारतीय लष्कराशी तसंच ऑपरेशन सिंदूरशी संबंधित गुप्त माहिती पाकिस्तानला

पुरवत असल्याची धक्कादायक माहिती चौकशी दरम्यान समोर आल्याचं कैथालचे पोलीस अधीक्षक आस्था मोदी यांनी सांगितलं आहे.

**<><><><><><>**

नवी दिल्लीत आम आदमी पार्टीच्या १५ नगरसेवकांनी पक्षाचा राजीनामा देत इंद्रप्रस्थ विकास आघाडी हा स्वतंत्र पक्ष स्थापन केला आहे. गेल्या दोन वर्षात आम्हाला जनतेच्या हिताची कामं करण्यात अडथळे आले तसंच पालिकेचं कामकाजही या कालावधीत सुरळीत न चालल्यानं आपण पक्षाचा राजीनामा देत असल्याचं नवनिर्मित पक्षाचे अध्यक्ष हेमचंद गोएल यांनी सांगितलं. आणखीही काही नगरसेवक आपल्यासोबत नविन पक्षात सहभागी होणार असल्याचं गोएल यांनी म्हटलं आहे.

**<><><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धा एका आठवड्यानंतर आज पुन्हा सुरू होत असला तरी आज त्यावर पावसाचं सावट पसरलं आहे. यजमान रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि कोलकाता नाईट रायडर्स यांच्यातील सामना बंगळुरूमध्ये चिन्नास्वामी स्टेडियम इथं आज, संध्याकाळी साडेसात वाजता सुरू होणार होता. मात्र, मुसळधार पावसामुळे अद्याप खेळ सुरू होऊ शकलेला नाही.

यापूर्वी, भारत आणि पाकिस्तानमधील तणावामुळं नऊ मे रोजी आयपीएल स्पर्धा स्थगित करण्यात आली होती. उर्वरित सामन्यांचं नवीन वेळापत्रक जाहीर करण्यात आलं आहे. मोहाली आणि धरमशाला इथं आता सामने होणार नाहीत. २५ मे रोजी होणारा अंतिम सामना आता ३ जून रोजी होणार आहे. प्लेऑफ सामन्याची ठिकाणं यथावकाश जाहीर होतील.

<><><><><>

जर्मनीमध्ये सुहल इथं होणाऱ्या आय. एस. एस. एफ ज्युनियर आंतरराष्ट्रीय नेमबाजी स्पर्धेत सहभागी होण्यासाठी भारतीय नेमबाज आणि सहाय्यक कर्मचाऱ्यांची पहिली तुकडी आज, तर दुसरी तुकडी उद्या रवाना होणार आहे. येत्या २० ते २६ मे या कालावधीत ही स्पर्धा होणार आहे. गेल्या वर्षी तीनपैकी दोन आयएसएसएफ ज्युनियर स्पर्धांमध्ये अव्वल स्थान पटकावणाऱ्या भारतानं यंदा ५७ नेमबाजांचा सर्वात मोठा संघ मैदानात उतरवला आहे.

<><><><><>

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनकार्याशी संबंधित ठिकाणांचं दर्शन घडवणारं 'छत्रपती शिवाजी महाराज सर्किट' या मार्गावर रेल्वे गाडी चालवण्यात येणार आहे . भारत गौरव टूरीस्ट ट्रेन अंतर्गत आयोजित ही रेल्वे सहल येत्या नऊ जूनपासून सुरू होणार असल्याची माहिती राज्याचे पर्यटनमंत्री शंभूराज देसाई यांनी दिली. मुंबईहून निघणाऱ्या या पाच दिवसांच्या विशेष सहलीत ही रेल्वे रायगड, पुणे, शिवनेरी, भीमाशंकर, प्रतापगड, कोल्हापूर आणि पन्हाळगडाला भेट देऊन मुंबईत दादरला परतणार आहे.

<><><><><>

दक्षिण लेबनॉनच्या माझरात जेमजीम गावात हेजबोल्ला या दहशतवादी संघटनेचा म्होरक्या आज आय डी एफ अर्थात इस्त्राएल संरक्षण दलाच्या हल्ल्यात ठार झाला.

//<><><><><>//